कक्ष प्रमुख यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२०२६
(एक खिडकी परवानगी कक्ष)

जा.क्र. – एक खिडकी कक्ष /5563/२०२६

दिनांक: 29/01/२०२६

"कृपया प्रसिध्दी करिता

प्रेस नोट
03/02/2026

माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका

विषय : पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ एक खिडकी परवानगी कक्षामार्फत स्विकारण्यात आलेल्या अनामत रकमेबाबत.

पुणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रत्यक्ष मतदान दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी पार पडले. उमेदवारांनी प्रचारफेरी / सभा / मिरवणूक याद्वारे प्रचार केला आहे. प्रचारफेरी / सभा / मिरवणूक यासाठी पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ चे नियमानुसार एक खिडकी परवानगी कक्षामार्फत विविध परवानग्या देण्यात आल्या आहेत. यासाठी प्रथमच ऑनलाईन संगणक प्रणालीचा वापर करण्यात आला होता.

वरील पैकी काही परवानगी देतांना उमेदवारांकडून अनामत रक्कम स्विकारण्यात आली होती. अनामत रक्कम परत करण्याचे काम ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे होणार आहे. तरी सदर प्रतिनिधींनी / उमेदवारांनी / पक्षांनी खालील दिलेल्या लिंकवर जाऊन अनामत रक्कम परत प्राप्त करून घेणेकरिता अर्ज करायचा आहे. अर्ज करणेकरीता खाली दिलेली लिंक दि. ०२/०२/२०२६ ते ०२/०४/२०२६ अखेर पर्यंत उपलब्ध राहणार असून त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

लिंक : https://electionpermits.pmc.gov.in/

29.1.26

(रवि पवार)
एकखिडकी परवानगी कक्ष प्रमुख
तथा उप आयुक्त
कर आकरणी व कर संकलन विभाग
पुणे महानगरपालिका